# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.02.2025** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान फ्रान्सच्या दौऱ्यावर, कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भुषवणार
2. संसदेच्या दोन्ही सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा आज पुढे सुरू राहाणार
3. दिल्लीत आजपासून ऊर्जा सप्ताहाला प्रारंभ
4. देशात गेल्या वर्षात पंचवीस हजार कोटींहून अधिक मूल्याचे अमली पदार्थ जप्त आणि
5. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राला ट्रायथलॉनमध्ये सुवर्णपदक

**<u>पंतप्रधान फ्रान्स दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर असून आज ते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवतील. तत्पुर्वी पंतप्रधानांचे काल रात्री फ्रान्समध्ये आगमन झाले, त्यावेळी विमानतळावर फ्रान्सचे सशस्त्रदल मंत्री सेबास्टियन लेकोर्नू यांन त्यांचे स्वागत केले. तिथल्या भारतीय समुदायानं देखील मोदी यांचं अत्यंत जल्लोषात स्वागत केलं. पॅरीसमधील थंड हवामानाला न जुमानता भारतीय समुदायाने केलेलं स्वागत संस्मरणीय ठरले. असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. प्रवासी भारतीय समुदायाविषयी त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली. त्यानंतर पंतप्रधानांनी मॅक्रॉन यांची भेट घेतली, त्याविषयीही समाज माध्यमावरील संदेशात आनंद व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी आज होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय संदर्भातल्या कृती परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत जागतिक एआय मानके स्थापित करण्याच्या आणि एआयच्या जबाबदार विकासाला प्रोत्साहन देण्याविषयी चर्चा होणार आहे. तसंच भारत-फ्रान्स द्वीपक्षीय संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्याशी मोदी चर्चा करणार आहे. उभय देशांदरम्यान महत्त्वाचे द्वीपक्षीय करार होण्याचीही अपेक्षा आहे.

या दौऱ्यात ऐतिहासिक मार्सेल शहराला भेट देण्याचा मोदी यांचा मानस असून तिथे पहिल्या भारतीय वाणिज्य दुतावासाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. भारतीय समुदायासाठी महत्त्वाचे असलेल्या दुतावासामुळे भारत मध्यपूर्व युरोप आर्थिक परिक्षेत्रामध्ये ते महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्याशिवाय उभय देशांचे सहकार्य असलेल्या थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटर रिॲक्टर प्रकल्पाला मोदी भेट देतील. तसंच पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात बलिदान दिलेल्या भारतीय सैनिकांना मजारग्यूज युद्ध स्मशानभूमीत श्रद्धांजली अर्पण करतील. फ्रान्सच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान, बुधवारी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत.

**<u>आरोग्य-हत्तीपाय रोग</u>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लिम्फॅटिक फिलेरियासिस म्हणजेच हत्तीपाय रोग निर्मूलनासाठी, वार्षिक राष्ट्रव्यापी मोहिमेचा शुभारंभ केला. या आजाराच्या निर्मूलनासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असून, 2027 पर्यंत या आजाराचे निमूर्लन करण्याचे लक्ष्य साध्य करण्याचा सरकारचा संकल्प आहे. त्यासाठी 13 राज्यातल्या 111 जिल्ह्यांमध्ये साडेसतरा कोटींहून अधिक नागरिकांना मोफत औषधोपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

**अर्थसंकल्प-राज्यसभा**

राज्यसभेत काल अर्थसंकल्पावर चर्चा सुरू झाली. भाजप सरकारच्या काळात देशाचा आर्थिक विकास दर घसरला आहे, असा आरोप माजी अर्थमंत्री आणि काँग्रेस खासदार पी. चिदंबरम यांनी केला. आर्थिक सर्वेक्षणाचा उल्लेख करत त्यांनी 2014 मध्ये उत्पादनक्षेत्राचा हिस्सा 15 टक्के होता, तो 2019 मध्ये 13 पूर्णांक 46 शतांश टक्क्यांवर, तर 2023 मध्ये 12 पूर्णांक 93 टक्क्यांवर आला आहे. उत्पादन निगडित सवलत योजना अयशस्वी ठरल्या आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. बेरोजगारीबद्दलची निश्चित आकडेवारी सरकारनं दिली नसल्याची टीका त्यांनी केली. सध्या तरुणांमध्ये 10 टक्के तर पदवीधरांमध्ये 13 टक्के बेरोजगारी दर आहे, मात्र सरकारनं देशात निव्वळ 3 पूर्णांक 2 दशांश टक्के बेरोजगारी असल्याचं म्हटलं आहे, असा आरोप चिदंबरम यांनी केला. तृणमूल कॉंग्रेस, वायएसआर कॉंग्रेस, शिवसेना, डीएमके, बीजू जनता दल, समाजवादी पार्टी आदी पक्षांच्या सदस्यांनीही अर्थसंकल्पावर टीका केली.

अमेरिकेतील बेकायदेशीर भारतीयांना परत आणण्याच्या मुद्द्यावरूनही चिंदबरम यांनी सरकारवर टीका केली. या आरोपांना उत्तर देताना सभागृहाचे नेते जे पी नड्डा यांनी सरकारनं उत्पादन क्षेत्रासह विविध क्षेत्रांसाठीच्या विविध उपाययोजनांचा उल्लेख केला. अमेरिकेतून भारतात आणलेल्या नागरिकांबाबत सर्व आवश्यक नियमांचे पालन करण्यात आल्याचं नड्डा यांनी सागितलं. तर हा अर्थसंकल्प राष्ट्रीय विचारांचा आणि सर्वसमावेशक असल्याचं भाजपा खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी सांगितलं.

**लोकसभा**

लोकसभेत काल अर्थसंकल्पावरच्या चर्चेला पुढे सुरुवात झाली. आर्थिक वर्ष 2025-26 वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात उद्योजकांना, व्यावसायिकांना झुकतं माप देण्यात आलं असून जनतेच्या बेरोजगारी, महागाई या समस्यांकडे दुर्लक्ष झालं आहे, असा आरोप द्रमुकचे दयानिधी मारन यांनी केला. भारतीय अर्थव्यवस्थेची गती मंदावली आहे, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयानं आजवरची नीचांकी पातळी गाठली आहे, अशी टीका त्यांनी केली.

नोटाबंदीच्या वेळी जाहीर केलेलं कोणतंही उद्दिष्ट साध्य करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, असं काँग्रेसच्या मनीष तिवारी यांनी सांगितलं. अर्थसंकल्पात दाखवलेल्या वित्तीय तुटीबद्दल त्यांनी सवाल उपस्थित केले तसंच देशातल्या कृषी क्षेत्राला अनेक समस्या भेडसावत असल्याचंही त्यांनी सभागृहात सांगितलं. खासदार सुप्रिया सुळे यांनीही रुपयाच्या घसरणीच्या मुद्द्यावरून टीका केली आणि भांडवली खर्चात कपात झाल्याबाबत तसंच घरगुती कर्जे वाढत असल्याची टीका केली. या चर्चेत कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस, जेएमएम आदी पक्षांच्या सदस्यांनी सहभाग घेतला.

या चर्चेत भाग घेताना भाजपा खासदार अनुराग सिंह ठाकूर यांनी अर्थसंकल्पाची प्रशंसा केली. आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज चर्चेला उत्तर देण्याची शक्यता आहे.

**राष्ट्रपती युनानी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज युनानी दिन निमित्त दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. प्रसिद्ध युनानी चिकित्सक हकीम अजमल खान यांच्या जयंतीनिमित्त आज 11 फ्रेबुवारी हा दिवस युनानी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आयुष मंत्रालयाअंतर्गत असलेल्या सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन युनानी मेडिसीनच्या वतीने, युनानी उपचारातील नवोन्मेषासंदर्भातील, इनोव्हेशन्स इन युनानी मेडिसीन फॉर इंटिग्रेटिव्ह हेल्थ सोल्युशन्स- अ वे फॉरवर्ड या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

**उर्जासप्ताह**

दिल्लीत आजपासून भारत ऊर्जा सप्ताह 2025 चा प्रारंभ होत आहे. येत्या शुक्रवार पर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमाचं पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन होणार आहे. या चार दिवसांमध्ये मंत्रीस्तरीय अधिकारी आणि मुख्य कार्यकारी

अधिकारी सहभाग, प्रदर्शनाची जागा आणि आयोजित केली जाणारी सत्रे यांची संख्या पाहता हा जागतिक स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम असेल. देशातली यशस्वी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही जागतिक स्तरावर स्वीकारार्ह आदर्श योजना म्हणून सादर केली जाईल. या सप्ताहात कॅनडा, जर्मनी, जपान, अमेरिका आणि इंग्लंड यांची दालने असतील.

**भारत इंग्लंड उर्जा सुरक्षा**

भारत आणि इंग्लंड दरम्यान चौथा ऊर्जा संवाद काल ऊर्जा मंत्री मनोहर लाल आणि इंग्लंडचे समपदस्थ एड मिलीबंद यांच्यात पार पडला. उभय देशांच्या ऊर्जा क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आढावा यात घेण्यात आला. त्यामध्ये वीज आणि अक्षय ऊर्जा यांचाही समावेश होता.

**अमली पदार्थ**

अमली पदार्थांविरोधात शून्य सहनशीलता धोरणाचा भाग म्हणून करण्यात आलेल्या कारवाईत 2024 मध्ये पंचवीस हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याचे अमली पदार्थ जप्त केले  आहेत, 2023 मध्ये जप्त केलेल्या अमली पदार्थांच्या तुलनेत ते 55 टक्के अधिक असल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयानं जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**एटीएस अटक**

छत्तीसगड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकानं मुंबईत तीन बांग्लादेशींना अटक केली आहे. भारतात बेकायदेशीर वास्तव्य करून बनावट कागदपत्रांआधारे इराकला जाण्याचा त्यांचा विचार होता. मोहम्मद इस्माईल, शेख अकबर, शेख साजन अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. रायपूरच्या टिकरापारा भागात राहाणारे हे तिघेही गेल्या महिन्यात रेल्वेने मुंबईला आले होते. मुंबई एटीएसच्या मदतीने या तिघांनाही मुंबईच्या पायधोनी भागात अटक करण्यात आली आणि सोमवारी त्यांना रायपूरला परत आणण्यात आले.

**थायलंड आर्चरी**

बँकॉक इथं सुरू असलेल्या दिव्यांग तिरंदाजी आशिया चषक स्पर्धेत भारताच्या सरिता हिने महिलांच्या संयुक्त खुल्या प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली. काल दुपारी झालेल्या सामन्यात तिने सिंगापूरच्या खेळाडूवर 143-142 असा विजय मिळवला. तर पुरूषांच्या डब्यू1 प्रकारात भारताच्या आदिल मोहम्मग नाझीरने हाँगकॉगच्या खेळाडूचा पराभव केला.

**राष्ट्रीय क्रीडा**

उत्तराखंडमध्ये  सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कालचा दिवस नवीन विक्रमांचा होता. पोल व्हॉल्ट प्रकारात मध्य प्रदेशाच्या देव मीनाने राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत 5 पूर्णांक 32 मीटर उंची गाठत सुवर्णपदक जिंकले तर, उत्तर प्रदेशने महिलांच्या हातोडा फेक स्पर्धेत पोडियम स्वीपसह वर्चस्व गाजवले. महिला टेबल टेनिसमध्ये पश्चिम बंगालने सुवर्णपदक तर महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. तर सांघिक टेनिस स्पर्धेत गुजरातला सुवर्ण, महाराष्ट्राला रौप्य पदक मिळाले. मिश्र ट्रायथलॉनमध्ये, महाराष्ट्राने सुवर्णपदक जिंकले, हरियाणाने रौप्यपदक जिंकले आणि गोव्याने कांस्यपदक जिंकले.

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**